पिंपळगांव हरे पोलीस स्टेशन
दिनांक १३/०६/२०२६

## पिंपळगांव हरे पोलीसांची मोठी कारवाई -गावठी पिस्तलसह आरोपी जेरबंद

जिल्हयात अवैधरित्या घातक शस्त्रे व अग्नीशस्त्र बाळगणा-या इसमाबांबत गोपणीय माहीती काढुन त्यांच्या विरोधात वेळोवेळी कारवाई करण्याबाबत मा. श्रीकांत धिवरे पोलीस अधिक्षक सो जळगांव यांनी जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिका-यांना मार्गदर्शनपर सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने कल्याणी वर्मा प्रभारी अधिकारी पिंपळगांव हरे पोलीस स्टेशन यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व पोलीस अंमलदार यांना गोपणीय माहीती मिळवुन जास्तीत जास्त अवैधरित्या घातक शस्त्र व अग्नीशस्त्र बाळगणा-या इसमाविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते .

दिनांक १३/०६/२०२६ रोजी सहा पोलीस निरिक्षक कल्याणी वर्मा यांना गुप्तबातमीदारा मार्फत बातमी मिळाली की पिंपळगांव हरे पोलीस स्टेशन हद्दीतील सातगांव ता पाचोरा गावा बाहेर इसम नामे किशोर लक्ष्मण पाटील हा गुन्हा करण्याच्या उद्देशाने कमरेला  गावठी कट्टा लावुन फिरत असल्याची खात्रीशीर बातमी  मिळाल्याने सहा पोलीस निरिक्षक कल्याणी वर्मा यांनी  पोहेकॉ १४८९ अतुल पवार यांचे पथक तयार करुन मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणे बाबत आदेशीत केल्याने सदर पथकाने सदर ठिकाणी जावुन खात्री केली असता तेथे एक इसम हा संशईत रित्या फिरत असतांना आढळुन आल्याने .सदर इसमाकडे विचारपुस केली असता त्याच्याकडुन समाधानकारक उत्तर निळाले नाही तसेच त्याच्या हालचाली संशायास्पद वाटल्याने सदर पथकातील पोलीस अंमलदार यांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कब्जातुन २०,००० रुपये किंमतीची गावटी बनावटीची मॅंगझीनसह एक पिस्तल मिळुन आली.

त्याअनुषंगाने आरोपी नामे किशोर लक्ष्मण पाटील वय ३२ वर्ष रा सार्व पिंप्रि ता पाचोरा जि. जळगांव याच्या कब्जातील गावठी बनावटीची मॅंगझीनसह एक पिस्तल जप्त करुन त्याच्याविरुध्द पिंपळगांव हरे पोलीस स्टेशन येथे गु.र.न २९४/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ सह मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१),(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास पोउपनि विठ्ठल पवार पिंपळगांव हरे पोलीस स्टेशन हे करीत आहेत .

सदरची कारवाई मा. श्रीकांत धिवरे सो  पोलीस अधिक्षक जळगांव मा.अशोक नखाते सो  ,अपर पोलीस अधिक्षक तसेच मा. श्री.बापु रोहम सो उपविभागीय पोलीस अधिकारी पाचोरा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरिक्षक कल्याणी वर्मा यांच्या नेतृत्वाखाली पोहेकॉ १४८९ अतुल पवार, पोहेकॉ १३४१ अभिजित निकम ,पोना १३६६ राहुल बेहेरे  पोकॉ २४४४ अमोल पाटील, पोकॉ २४१० प्रमोद वाडीले ,पोकॉ ६१० नामदेव इंगळे सर्व नेमणुक पिंपळगांव हरे पोलीस स्टेशन यांच्या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.


स्टेशन